महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १९ वा दिनांक : ०३/१०/२०२४ वार : गुरूवार

## ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्याचे अपहरण करून बोटे छाटली



**नांदेड :** नांदेडमध्ये ठाकरे गटाच्या उपशहर प्रमुखाचे अपहरण करून बोट छाटण्यात आले आहे. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मारहाण केल्याचा आरोप त्यांच्याकडून करण्यात आला आहे. फेसबूक पोस्टच्या वादातून उपशहर प्रमुखाचे अपहरण करून त्यांना मारहाण केली असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे राजकीय गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, भाजपचे माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे नाव न घेता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे लुळा येथील उपशहर प्रमुख संतोष वडवळे यांनी काही आक्षेपार्ह पोस्ट फेसबूकवर टाकल्या होत्या. या पोस्टवरून भाजपच्या कार्यकर्त्यांनी तुप्पा येथून वडूवळे यांचे अपहरण केले होते. तसेच त्यांना एका फार्महाऊसवर नेऊन बेदम मारहाण केली. तसेच त्यांचे दोन बोटे देखील छाटण्यात आले आहेत.

दारूच्या बाटल्या डोक्यात फोडण्यात आल्या होत्या असं सांगण्यात आले आहे. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करून आरोपी पळून गेल्याची माहिती आहे. या संपूर्ण प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. मतदारसंघात भाजपची दादागिरी वाढली असून आरोपींना अटक केली नाही तर लोहा बंद करण्यात येईल, असा इशारा ठाकरे गटाकडून देण्यात आला आहे. तर संतोष वडवळे यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात आली आहे.

पोलीस उपअधीक्षक सुशील कुमार नाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नेमकं गुन्हा घडण्याचे कारण काय आहे? हे तपासले जाणार आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होईल असं त्यांनी म्हटले आहे.

संतोष वडवळे यांच्या आईने देखील प्रतिक्रिया दिली आहे, त्या म्हणाल्या की, माझ्या मुलाला प्रचंड मारहाण केली आहे. बळजबरीने दारू पाजून नाचवण्यात आले. तसेच आमच्या कुटुंबाला धमकी देण्यात आली आहे. असा आरोप केला आहे. दरम्यान, या संपूर्ण घटनेमुळे नांदेडमध्ये भाजप आणि ठाकरे गटात तणाव वाढण्याची शक्यता आहे.

## नोकरीवाल्यांना एक नंबर मुलगी तर शेतकऱ्याला तीन नंबरचा गाळ मिळतो

### आमदाराचे वादग्रस्त विधान

**मुंबई:** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गटातील आमदार देवेंद्र भुयार सध्या त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चांगलेच चर्चेत आले आहेत. अमरावतीत बोलताना देवेंद्र भुयार म्हणाले की, एक नंबरची मुलगी चांगल्या नोकरीवाल्यांना मिळते, दोन नंबरची मुलगी पान टपरी आणि किराणा माल दुकानदारांना मिळते तर तीन नंबरची मुलगी शेतकऱ्याच्या पोराला मिळते. या वादग्रस्त वक्तव्यानंतर भुयार यांच्यावर विरोधकांकडून जोरदार टीका केली जात आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, अजितदादा गटातील देवेंद्र भुयार यांचं हे वक्तव्य आहे, हे केवळ महिलांचा अपमान करणारं नाही, तर ते इथल्या शेती व्यवसायाशी निगडीत असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा अपमान करणारं आहे. कृषीक्षेत्रासंबंधी अनास्था निर्माण करणारं आहे. तसेच, कृषीक्षेत्राला वाहून घेणारे जे भूमिपुत्र आहेत, त्यांची टिंगल उडवणारं, थट्टा करणारं वक्तव्य आहे. दुर्दैवं म्हणजे शिंदे, फडणवीस, अजित पवार या ट्रेनच्या अनेक वाचाळविरांकडून वारंवार अशी वक्तव्य होतात. पण, त्यांना आवर घालण्याची कुवत किंवा इच्छाशक्ती सरकारमध्ये बसलेल्या या तिघांचीही नाही. त्यामुळे हा मुजोरपणा, हा वाचाळपणा दिवसेंदिवस वाढत जात आहे. हे अत्यंत दु:खद आहे.

देवेंद्र भुयार हे अमरावतीत एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सध्या परिस्थिती अशी आहे की, जर तरुण मुलगा शेतकरी असेल, तर त्याला लग्नासाठी कुणी मुलगी देत नाही. एक नंबरची स्मार्ट, देखणी मुलगी हवी असेल, तर ती आपल्याला भेटत नाही. ती नोकरीवाल्याला भेटते. तर दोन नंबरची मुलगी ही छोटा-मोठा व्यवसाय करणाऱ्याला, किराणा दुकान मालकाला भेटते. तर, तीन नंबरचा जो गाळ शिल्लक राहतो, ती पोरगी शेतकऱ्याच्या मुलाला मिळते.

भुयार यांच्या या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे आता नागरिकांमधून मोठा संताप व्यक्त केला जात आहे. तर विरोधकांकडूनही त्यांच्यावर टीका केली जात आहे.

## आता त्यांना काय तोंड दाखवू : मुख्यमंत्री न भेटल्याने नरहरी झिरवळ नाराज



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते व विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या नेतृत्वात पेसा कायद्यांतर्गत आदिवासी मुलांची भरती व्हावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. मंत्रालया शेजारील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आले. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक दिवसाची वेळ मागितली होती तसेच भेटून चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अद्याप भेटीची वेळ दिली नसल्याने नरहरी झिरवळ निराश झाल्याचे दिसत आहे. विद्यार्थी घरी येऊन बसले आहेत, आता त्यांना काय तोंड दाखवू? असा सवाल झिरवळ यांनी उपस्थित केला आहे. एका वृत्तवाहिनीला बोलताना नरहरी झिरवळ यांनी त्यांचे दु:ख व्यक्त केले. पेसा अंतर्गत भरती सुरु व्हावी म्हणून आम्ही गांधीजींच्या पुतळ्यासमोर धरणे आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. त्यांना तोडगा काढण्याची विनंती केली होती. पण या प्रश्नाकडे सरकार संवेदनशीलपणे पाहत नाही असे म्हणावे लागेल, असे झिरवळ म्हणाले.

पुढे बोलताना नरहरी झिरवळ म्हणाले, सरकार आणि सरकारपुढे असलेली आव्हाने आम्ही देखील मान्य करतो. आम्ही सुद्धा तसे काही चुकीचे मागत आहे, असे नाही. तुम्हालाही अडचण येत आहे असेही नाही. मुख्यमंत्री म्हणाले एक दिवस थांबा. परवा सुनावणी होईल. सुनावणी दरम्यान निगेटिव्ह आणि पॉझिटिव्ह निकाल झाला तरी कोर्टाच्या आदेशाच्या आधीन राहून आदेश काढू, असे झिरवळ म्हणाले.

सुनावणीसाठी किती तारखा पडेल माहीत नाही. त्या ऐवजी सरकारने वेगळा पवित्रा घ्यायला लाऊ नये ही विनंती आहे. आम्ही वाट बघत आहोत. मुख्यमंत्र्यांचा व्याप खूप आहे. आम्हाला त्यातला थोडा वेळ हवा आहे. सरकार नुसते गोल गोल फिरवत असल्याची भावना मुलांमध्ये तयार झाली आहे. ही मुलं वेगळ्या स्टेपला जाण्याच्या मनस्थितीत आहेत. आम्ही या मुलांना थांबवत आहोत, असेही झिरवळ यांनी सांगितले.

नरहरी झिरवळ म्हणाले, आम्ही मुख्यमंत्र्यांचे ऐकले. आम्ही काल वाट पहिली. माझ्या घरी सुरुचीवर मुलं-मुली येऊन बसली आहेत त्यांना मी काय तोंड दाखवणार? त्यामुळे आज पक्ष कार्यालयात येऊन बसलो. इथे येऊन दोन तास बसलो आहे. आज वाट पाहू नंतर आम्ही ठरवू काय करायचे, असा सूचक इशारा झिरवळ यांनी दिला आहे.

## महात्मा गांधींचे विचार संपूर्ण विश्वासाठी दिशादर्शक - राजेश मुंढे





**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी यांनी आपल्या आचरणातून मानवी कल्याणाचा आणि अहिंसा व करुणामय जीवन जगण्याचा जो विचार या देशाला दिला तो देशासाठीच नाही तर संपूर्ण विश्वासाठी दिशादर्शक आहे असे प्रतिपादन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राजेश मुंढे यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राजेश मुंढे हे बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक प्राचार्य डॉ. हसन इनामदार हे होते.

पुढे बोलताना राजेश मुंढे यांनी आजच्या तरुण पिढीने गांधीजींची अहिंसा आणि लालबहादूर शास्त्री यांचा साधेपणा व देशभक्ती यांचा अंगीकार करावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुतिका कुलकर्णी यांनी केले तर प्रा. भाग्यश्री राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी डॉ. कांचन दुधडे कार्यालयीन अधीक्षक नूतन राजपूत, शंतनू खांडे, शुभम कांबळे, आशिया शेख यांनी परिश्रम घेतले याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ ऑक्टोबर २०२४

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या शहर संपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन

**छत्रपती संभाजीनगर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे शहर संपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. ना. रामदास आठवले साहेब, यांच्या हस्ते, दि.०५/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निराला बाजार येथील शॉप नं.२०५९२/४०C२१ मोतीवाला ट्रेड सेंटर येथे उद्‌घाटन होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून उद्‌घाटन सोहळ्याला मंत्री अतुल सावे साहेब, सिडको अध्यक्ष आ. संजय शिरसाठ साहेब, माजी केंद्रिय अर्थराज्यमंत्री खा. डॉ. भागवत कराड साहेब, खा. संदिपान भूमरे साहेब, मध्य विधान सभेचे आ. प्रदिप जैस्वाल साहेब प्रदेश कार्याध्यक्ष बाबूराव कदम मराठवाडा अध्यक्ष मिलिंद शेळके, प्रदेश उपाध्यक्ष दौलत खरात, जेष्ठ साहित्यीक डॉ. ऋषीकेश कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्र-कुलगुरु डॉ. वाल्मीक सरवदे, कांतीलाल जैन, श्री. संजय केनेकर, भाजपा प्रदेश महामंत्री शिरीष बोराळकर - शहर जिल्हाध्यक्ष भाजप, किशोर शितोळे- देवगिरी नागरी सहकारी बँक अध्यक्ष, राजेंद्र जंजाळ- जिल्हा प्रमुख शिवसेना, जिल्हा प्रमख - जिल्हाध्यक्ष संजय ठोकळ, जिल्हाध्यक्ष विजय मगरे, शहर सरचिटणीस तथा लोकसभा प्रमुख भाजप - समीर राजुरकर व आंबेडकरी चळवळीतील राजकीय सामाजिक चळवळीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे.

## माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर पुण्यात गुन्हा दाखल



**पुणे :** छत्रपती संभाजीनगर नावाला काळे फासून विद्रुपीकरण केल्याप्रकरणी माजी खासदार व एमआयएमचे नेते एम्तियाज जलील यांच्यासह त्यांचे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेवर पुण्यातील कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १९२, १९६, १९७ (अ), २९९), ३०२, ३५१, ३५२, ३५३ नुसार सदर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

याबाबत कोंढवा पोलिस ठाण्यात महेश पांडुरंग भोईबार (वय-२८,रा.कोंढवा, पुणे) यांनी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार सदर घटना २३ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता छत्रपती संभाजीनगर जालना महामार्गावरील समृध्दी पास, देवळवाडी फाटा, माहिको कंपनी, शेलगाव ब्रीज, मात्रेवाडी आदी ठिकाणी घडली आहे. एमआयएम या राजकीय पक्षाचे नेते इम्तियाज जलील व त्यांचे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी काढलेल्या रॅलीत दोन धार्मिक समूहात धार्मिक तेढ निर्माण करण्याचे उद्देशाने ‘ ये औरंगजेब का आबाद शहर था, और रहेगा, इसे हम संभाजीनगर बनने नही देंगे’ असे प्रक्षोभक भाषण केले.

छत्रपती संभाजीनगर या महामार्गावरील नामनिर्देशीत फलकावरील छत्रपती संभाजीनगर जालना महामार्गावरील विविध ठिकाणांच्या फलकांना काळे फासून त्यांनी विद्रुप केले आहे. पोलिस उपायुक्त आर राजा यांनी याबाबतचा गुन्हा कोंढवा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला असून पुढील तपासाकरिता संबंधित हद्दीतील पोलिसांकडे वर्ग करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

## निवडून आल्यावर रामगिरी महाराजांना अटक करणार : नीतेश राणेलाही माफी मागायला लावणार - माकप नेते नरसय्या आडम मास्तर



**सोलापूर :** येथील कम्युनिस्ट नेते व माजी आमदार नरसय्या आडम यांनी अल्पसंख्यांक मेळाव्यात बोलताना भाजप आमदार नीतेश राणे आणि रामगिरी महाराज यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

तसेच निवडून आल्यावर रामगिरीला बेड्या घातल्या नाही तर आडम मास्तर म्हणू नका, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्यावतीने सोलापूर शहर-मध्य विधानसभा मतदारसंघांमध्ये अल्पसंख्यांक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

या मेळाव्यात बोलताना आडम यांनी भाजप पक्षावर निशाणा साधला आहे. हिंदू आणि मुस्लिम यांच्यात द्वेष व तेढ निर्माण करत असल्याचा आरोप भाजपवर केला आहे. आडम म्हणाले, यंदाच्या वर्षी मी निवडून आल्यावर रामगिरीला बेड्या घातल्या नाही तर मला आडम मास्तर म्हणू नका. नारायण राणेच्या पोट्याला देखील आमदार झाल्यावर बघायचे आहे. आमदार झाल्यावर नीतेश राणेला माफी मागायला लावणार, असे आडाम म्हणाले.

पुढे बोलताना आडम म्हणाले, वक्फ बोर्डाच्या जागेवर पंतप्रधान नरेंद्र मोदींची नजर आहे. मी निवडून आल्यावर रस्त्यावर उतरून लढाई करू, असे ते म्हणाले. मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण द्यावे, याचा फायदा मुस्लिम समाजातील मुलांना होईल. देशात ८ हजार मुस्लिम तरुण जेलमध्ये सडले आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, भाजप आमदार नीतेश राणे यांनी काही दिवसांपासून आक्रमक भूमिका घेतली असल्याचे दिसत आहे. तसेच मुस्लिम समजाच्या विरोधात देखील त्यांनी वादग्रस्त विधान केले होते. यामुळे मुस्लिम समाज नीतेश राणे यांच्याविरोधात आक्रमक झाल्याचे देखील पाहायला मिळाले. हिंदू जागरण मेळाव्याच्या माध्यमातून नीतेश राणे विविध ठिकाणी जाऊन वादग्रस्त विधान करत आहेत.

नरसय्या आडम यांनी महाविकास आघाडीतून यावेळेस विधानसभेची जागा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

लोकसभा निवडणुकीत आडम यांनी कॉंग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांना इंडिया आघाडी म्हणून पाठिंबा दिला होता. तेव्हाच ही जागा माकपला देण्याची मागणी करण्यात आली होती.

